# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 21 October 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – २१ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- जागतिक भविष्याला आकार देण्यात भारत पुढाकार घेत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- परिवर्तन महाशक्ती आघाडीची दहा उमेदवारांची पहिली यादी जाहीर–भाकपची औरंगाबाद मध्य विधानसभा मतदार संघातून विधिज्ञ अभय टाकसाळ यांना उमेदवारी
- राजकीय पक्षांनी दुष्काळमुक्त मराठवाड्याचं लेखी आश्वासन द्यावं–मराठवाडा पाणी परिषदेची मागणी

आणि

- तीरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या दीपिका कुमारीला रिकर्व्ह प्रकारात रौप्य पदक

****

जागतिक भविष्याला आकार देण्यात भारत पुढाकार घेत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आज नवी दिल्लीत एका खाजगी वृत्तवाहिनीच्या जागतिक शिखर परिषदेला पंतप्रधान संबोधित करत होते. आर्टिफिशिअल इंटेलिजन्सला संपूर्ण जगभरात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणून ओळखलं जात असताना, आपल्या देशासाठी मात्र एआय म्हणजे आकांक्षी भारत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा पंतप्रधान मोदी यांनी आढावा घेतला.

****

राष्ट्रीय जल पुरस्कार उद्या नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान केले जाणार आहेत. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयानं सर्वश्रेष्ठ राज्य, जिल्हा, ग्रामपंचायत, शहरी स्थानिक स्वराज्य संस्था, पाणी वापर समूह आणि सर्वश्रेष्ठ नागरिक समाज अशा नऊ श्रेणींत ३८ विजेत्यांची घोषणा केली आहे. या पुरस्कारांचं हे पाचवं वर्ष आहे.

****

राज्यात नव्याने स्थापन झालेल्या परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीने दहा उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. या दहापैकी आठ जागा प्रहार जनशक्ती पक्षाला, तर दोन जागा राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेला देण्यात आल्या आहेत. राजू शेट्टी यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. अचलपूरमधून बच्चू कडू, रावेरमधून अनिल चौधरी, चांदवड-गणेश निंबाळकर, देगलूर-बिलोली सुभाष साबणे, हदगाव-हिमायतनगर-माधव देवसरकर, हिंगोली-गोविंदराव भवर, राजुरा-वामनराव चटप तर ऐरोली मतदार संघातून अंकुश कदम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. याशिवाय शिरोळ आणि मिरज या दोन जागा स्वाभिमानी शेतकरी संघटनेला देण्यात आल्या आहेत. मात्र, या जागांवर उमेदवारांच्या नावाची घोषणा लवकरच केली जाणार आहे. या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू उपस्थित होते.

****

भारतीय कम्युनिस्ट पक्षानं छत्रपती संभाजीनगर इथल्या औरंगाबाद मध्य विधानसभा मतदार संघातून विधिज्ञ अभय टाकसाळ यांच्या उमेदवारीची घोषणा केली आहे. पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ. भालचंद्र कांगो यांनी माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. भाकपला महाराष्ट्रातून अकरा जागा देण्याबाबत महाविकास आघाडीशी बोलणी सुरू असून, येत्या दोन दिवसात अंतिम निर्णय झाल्यानंतर आपण अंतिम उमेदवारांची घोषणा करू असंही डॉ कांगो यांनी सांगितलं.

****

पुण्यातल्या कसबा मतदारसंघातले काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांच्या संस्थेविरुद्ध आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर कसबा मतदारसंघातील नागरिकांना काल रविवारी रात्री सुगंधी, उटणे, उदबत्ती, रांगोळी अशा वस्तू असलेल्या पिशव्यांचं

वाटप हिंदमाता प्रतिष्ठान या संस्थेतर्फे करण्यात आलं. त्या पिशवीवर धंगेकर यांचं सपत्निक छायाचित्रं आहे, या माध्यमातून मतदारांना प्रलोभन दाखवण्यात आल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे.

****

भारत जोडो अभियानाचे संयोजक योगेंद्र यादव यांची अकोला इथली विचार सभा, वंचित बहूजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी उधळून लावली. महाराष्ट्र डेमोक्रेटिक फोरम–लोकशाही मंच द्वारे घेण्यात आलेल्या या सभेत योगेंद्र यादव यांचं भाषण सुरू होताच, वंचित बहूजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी काही प्रश्न उपस्थित केले. यावरून मोठा गोंधळ उडाला. त्यानंतर महायुतीविरोधात घोषणाबाजी देखील करण्यात आली. दरम्यान, धक्काबुक्की झाल्यानं पोलिसांनी घटनास्थळी जाऊन वंचितच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक लढवणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी आपल्या जाहीरनाम्यात दुष्काळमुक्त मराठवाड्याचे लेखी आश्वासन द्यावे, अशी मागणी मराठवाडा पाणी परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. मराठवाड्यातील सिंचन क्षमता ५० टक्क्यांन वाढवण्यासाठी एकात्मिक जलनिती या योजनेअंतर्गत सर्व पर्यायाचा विचार करून कालबध्द कार्यक्रम राबवला जावा अशी अपेक्षा देखील मराठवाडा पाणी परिषदेने आपल्या प्रसिध्दी पत्रकात व्यक्त केली आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज ठाणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

केंद्र सरकारने देशभरातल्या ६ लाख २६ हजार गावांमधल्या जमिनींच्या नोंदी संगणकीकृत केल्या असल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली आहे. नागरी क्षेत्रातल्या जमिनींचं सर्वेक्षण पुनर्सर्वेक्षण करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर नवी दिल्ली इथं झालेल्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेला ते संबोधित करत होते. भूसंसाधन विभागाने आतापर्यंत जमिनीच्या मालकी हक्काचे निदर्शक असलले १४ कोटी भू–आधार

क्रमांक वितरित केले असून नागरी भागातही जिओस्पेशियल तंत्रज्ञानाचा वापर करुन सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचं चौहान यांनी सांगितलं. सुरुवातीला १३० शहरांमधे हा प्रयोग राबवला जाणार आहे.

****

पोलिस स्मृतिदिवस आज पाळला जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रीय पोलिस स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख इथं चिनी सैन्याचा हल्ला मोडून काढताना, पोलिस विभागाचे दहा कॉन्स्टेबल हुतात्मा झाले होते. त्यांच्यासह देशभरात विविध मोहिमांमध्ये आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या पोलिसांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

पोलीस स्मृतिदिनानिमित्त राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी शहीद पोलीस हुतात्म्यांना मुंबईत नायगाव पोलीस मुख्यालयात श्रद्धांजली अर्पण केली. शिवसेना नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.

महाराष्ट्र पोलिस दलानेही एका ट्विट संदेशातून हुतात्मा पोलिसांना अभिवादन केलं आहे 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याचा मान राखत जीवाची पर्वा न करता देशसेवा करणाऱ्या सर्व हुतात्मा पोलिसांना सलाम, असं या संदेशात म्हटलं आहे.

****

मेक्सिको इथे झालेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताच्या दीपिका कुमारी हिला आज रिकर्व्ह प्रकारात रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत चीनच्या ली जियामन हिने सुवर्णपदक जिंकलं. तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत उपविजेतेपद पटकावण्याची दीपिकाची ही पाचवी वेळ आहे.

****

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतला दुसरा कसोटी सामना येत्या गुरूवारपासून पुणे इथं खेळवला जाणार आहे. बंगळुरू इथं झालेला पहिला कसोटी सामना न्युझीलंडनं जिंकत मालिकेत एक शुन्य अशी आघाडी घेतली आहे. तिसरा आणि अंतिम सामना मुंबई इथं एक नोव्हेंबरपासून खेळवला जाणार आहे.

****

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५६ व्या पुण्यतिथीनिमित्त अमरावती जिल्ह्यातल्या सर्वधर्म समभावाचे प्रतिक असलेल्या गुरुकुंज मोझरी इथं आज त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शिख, पारशी आणि ख्रिश्चन धर्मानुसार प्रार्थना घेण्यात आली.

****

सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षावर नाराजी व्यक्त करत महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचे संकेत दिले आहेत. महाविकास आघाडीत जर सन्माजनक वागणूक मिळत नसेल तर शेतकरी कामगार पक्ष तत्काळ महाविकास आघाडीतून बाहेर पडेल आणि आगामी निवडणुकीत सांगोला विधानसभेत उमेदवार देऊन स्वबळावर निवडणूक लढेल, अशी भूमिका शेकाप नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

****

हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव रोडवर झालेल्या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाला. पुसेगाव पाटी जवळ काल रात्री दहा वाजेच्या सुमारास भरधाव कारने दुचाकीला धडक दिल्याने हा अपघात झाला. गौतम धाबे आणि शेख सत्तार असं मृतांचे नाव असून बबन धाबे हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना नांदेड इथं उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीमुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा विभागीय लोकशाही दिन रद्द करण्यात आला आहे. निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शासनाच्या परिपत्रकातील तरतुदीनुसार हा निर्णय घेण्यात आल्याचं सामान्य प्रशासन विभागाचे अपर आयुक्त जगदिश मिनीयार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितलं आहे.

****

सोने आणि चांदीच्या दरानं उच्चांक गाठला आहे. आज २४ कॅरेट सोन्याचा १० ग्रॅमसाठीचा दर ७८ हजार ४०० रुपये, तर एक किलो चांदीचा दर ९८ हजार १९० रुपये आहे. आज, देशांतर्गत शेअर बाजारात चांगली खरेदी दिसून येत असून सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांकांत वाढ नोंदवली.

सुरुवातीला निफ्टीने वाढीसह २४ हजार ९५० चा टप्पा पार केला तर सेन्सेक्समध्ये ४०० हून अधिक अंकांची वाढ दिसून आली.

****

येत्या २४ तासांत पूर्व मध्य बंगालच्या उपसागरावर आणि उत्तर अंदमान समुद्रालगतच्या भागात कमी दाबाचं क्षेत्र तयार होण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तमिळनाडू, पुदुचेरी, कराईकल, केरळ आणि दक्षिण अंतर्गत कर्नाटकात पुढील तीन दिवसांत मुसळधार पावसाचा अंदाज आहे. तसंच उद्या कर्नाटक आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ बुधवारपर्यंत तयार होईल आणि गुरुवारी ओडिशा आणि पश्चिम बंगाल किनारपट्टीवर ताशी १०० ते १२० किलोमीटर वेगाने वाऱ्यासह धडकेल असंही विभागातर्फे सांगण्यात आलं आहे.

****